# जालना जिल्ह्यातील महिला बचत गट आणि उद्योग

**तुकाराम बाबासाहेब पिठोरे**
संशोधक विद्यार्थी
महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय
जालना.

**डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे**
मार्गदर्शक
महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य
महाविद्यालय,जालना

**प्रस्तावना:**

ग्रामीण भागातील गरिबी निर्मूलन करून महिलांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयंसहायता गट, ग्रामसंघ, प्रभाग संघ, उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात आल्या. याद्वारे शाश्वत उपजीविकेचे स्रोत व त्यांनी तयार केलेल्या वस्तू व उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी दोन वर्षांपूर्वी महाजीविका अभियान राबवण्यात आले. यात जालना जिल्ह्यातील १० हजार महिलांनी विविध प्रकारची ४४ उत्पादने तयार करत त्याची उत्कृष्ट पॅकिंग करून विक्री सुरू केली. शिवाय, ऑनलाइन संकेतस्थळळही सुरू करत त्यावर राज्यभरातून आलेल्या ऑर्डप्रमाणे उत्पादने घरपोच विक्री केली जात आहेत. जालना जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या उत्पादक गटांची दखल राज्यस्तरावरून घेण्यात आली असून सातारा, रत्नागिरी व जालना या तीन जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

जालना जिल्ह्यातील १०-२० नव्हे तब्बल २११ गावखेड्यातील २०८५ बचत गटाअंतर्गत महिलांनी वैयक्तिक, समूहस्तरावरील उद्योग सुरू केले आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत (माविम) विविध शासकीय योजनांचा लाभ, बँकांचे कर्ज घेऊन या महिलांनी उद्योग, व्यवसाय सुरू केले असून, स्थानिक बाजारपेठेत या मालाला मागणीही वाढली आहे. महिलांच्या पुढाकारातून त्यांच्या कुटुंबाची प्रगती होत असून, गावांतील व्यवहारालाही चालना मिळाली आहे. महिला, मुलींच्या उन्नतीसाठी शासनामार्फत विविध योजना राबविल्या जातात. या अनुषंगाने महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत जिल्ह्यात महिला बचत गटांचे जाळे विणण्यात आले आहे. या महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ देणे, उद्योग सुरू करणे, उद्योगासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम माविम अंतर्गत केले जाते. माविमअंतर्गत जिल्ह्यातील २२१ गावांत २०८५ महिला बचत गटाची स्थापना करण्यात आली आहे. या गटांमध्ये प्रत्येकी १० ते १२ महिलांचा समावेश असून, एकूण २४ हजार २८ महिला या बचत गटाशी जोडल्या गेल्या आहेत. या गटांतर्गत मासिक बचत करणेच नव्हे तर स्वत:चे

उद्योग, सामूहिक उद्योग सुरू करण्याचे कामही माविमअंतर्गत करण्यात आले आहे. या गटांमुळे संबंधित महिलांची त्यांच्या कुटुंबाचीच नव्हे तर गावाची प्रगती होण्यासही हातभार लागल्याचे दिसून येत आहे.

**उमेद मार्ट:**

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्यात उमेद अभियान राबवले जाते. या अंतर्गत ग्रामीण महिलांनी तयार केलेले खाद्यपदार्थ व वस्तू यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी जालना शहरांमध्ये उमेद मार्ट ही संकल्पना राबविण्यात आली आहे. ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या तब्बल 44 वस्तू व उत्पादने या मार्ट मध्ये विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या वस्तूंची ऑनलाईन विक्री देखील करण्यात येत आहे. उमेद मार्टच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आपल्या वस्तू व सेवा विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. यातून ग्रामीण भागातील महिला तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होऊन ग्रामीण भागातील दर्जेदार उत्पादने व सेवा शहरातील नागरिकांना सहज उपलब्ध होत आहेत. या वस्तू व सेवांची ऑनलाइन विक्री देखील करण्यात येत आहे. www.umedmart.com या संकेतस्थळावरून सर्वसामान्य नागरिक या वस्तू उत्पादने ऑनलाइन देखील मागवू शकतात.

**सामूहिक उद्योग:**

माविम अर्थात महिक्ल आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत बँका मार्फत सामूहिक उद्योग सुरू करण्यासाठी १  लाख ते १७ लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले आहे. महिलांनी समूह शेती, भाडेतत्त्वावर शेती, धान्य खरेदी- विक्री, निंबोळी अर्क, भाजीपाला खरेदी विक्री, कापडी पिशव्या शिवणे, फिनाईल हँडवाश, एलईडी बल्ब, दाळमिल, मिरची पावडर, हळद पावडर, विविध मसाले, पापड तयार करणे, हॅण्डीक्रॉप वस्तू, दूध संकलन आणि प्रक्रिया आदी उद्योग सुरू केले आहेत.

**वैयक्तिक उद्योग:**

महिलांना वैयक्तिक उद्योग सुरू करण्यासाठी महिला आर्थिक विकास महाम्नादालाच्या प्रत्नातून बँकांकडून एक लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्यात शिवणकाम, ब्यूटीपार्लर, भोजनालय, स्टेशनरी, कटलरी, किराणा दुकान आदी विविध उद्योग महिलांनी सुरू केले आहेत. सामूहिक, वैयक्तिक उद्योगातून उत्पादित होणारा माल हा स्थानिक बाजारपेठ ते जिल्हास्तरावरील बाजारपेठेत विक्री केला जातो. विशेषत: विभागीय, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनातही बचत गटाचे उत्पादन मांडून त्याला बाजारपेठ मिळवून दिली जाते.

**द्रोण, घासणी व पापड उद्योग:**

पुर्वीच्या काळी पळसाच्या पाना पासून अनेक वर्षापासून पत्रावळी आणि द्रोण बनवण्यात येत असत. परंतू आता आधुनिकीकरणामुळे पत्रावळीची जागा पेपर डिश ने घेतली आहे. वापरा आणि फेकून नष्ट करा आणि निसर्गाला प्रदूषण मुक्त ठेवा हे ब्रीद घेऊन प्रगती महिला बचत गट तिर्थपुरी ता. घनसावंगी येथील महिलांनी द्रोण बनविण्याबरोबरच  घासणी व पापड उद्योग सुरू करून रोजगार मिळवला आहे. तिर्थपुरीच्या महिला शिवकन्या भानूदास चिमणे, सचिव सारीका अशोक चिमणे, संचालक रूखमीन रामदास चिमणे या तीन महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून एकत्रीत येत पंचायत समिती घनसावंगी च्या जीवन्नोती अभियानांतर्गत उमेद या प्रकल्पातून उत्पादक गट निर्माण करून प्रगती महिला बचत गट तयार करून त्यांना मिळालेल्या अर्थसहाय्यातून प्रथमच या महिलांनी द्रोण बनविण्याचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी त्यांनी कच्चा माल विविध रंगांचे वॉटर प्रूफ कागद, सिल्वर ,गोल्ड ,प्लास्टिक कोटेड पेपर डिश पुणे येथून आणून हा व्यवसाय सुरू केला.नियमीत दिवसाला मागणीनुसार तीन हजारापर्यंत द्रोण बनविण्यात येत आहे. या व्यवसायातून त्यांना मिळालेल्या फायद्यातून पुढे त्यांनी घासणी बनविणे तसेच पापड उद्योगही सुरू करून प्रगती साधली आहे.

**सॅनिटरी पॅड निर्मिती:**

जालना शहरातील  बचत गटाच्या महिलांनी सॅनिटरी पॅड निर्मिती उद्योग सुरु केला असून भारतातील अनेक राज्यांतून या सॅनिटरी पॅडला मोठी  मागणी येत आहे. जालना शहरातील जालना महापालिका आणि उजास अंतर्गत २५ महिलांना पुनर्वापर करण्यायोग्य सॅनिटरी पॅड निर्मितीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रकल्पा अंतर्गत महिलांनी तयार केलेले सॅनेटरी पॅड परराज्यात पाठविण्यात आले आहेत. जालना शहरातील आठ बचत गटांच्या 25 महिलांनी तयार केलेली सॅनेटरी पॅडला गुजरात, मध्यप्रदेश, ओडिशा आणि उत्तराखंडमधील डेहराडून येथे  विक्रीसाठी पाठवले जात आहेत.

**शेळी पालन आणि लोणचे निर्मिती:**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या मार्फत सन 2013 मध्ये माऊली बचत गट मठ पिंपळगाव येथे बचत गटाच्या व्यवस्थापिका नीता कोठोडे आणि संयोजिका प्रभा मगरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेळीपालन सुरू झाले .पाहता पाहता हा व्यवसाय 200 शेळयापर्यंत पोहोचला आणि मग कामातील अनुभव मिळणारे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन पाहून हळूहळू आंब्याचे ,मिरचीचे लोणचे, आवळा कॅन्डी, आवळा सुपारी अशा घरगुती वापरासाठी असलेल्या पदार्थांचे उत्पादन सुरू झाले. परिसरातील महिलांना एकत्र केल्या गेले आणि या बचत गटाच्या माध्यमातून सुमारे 10 टन लिंबाचे

लोणचे आत्तापर्यंत विक्री झाले आहे. याच व्यवसायाच्या जोडीला हंगामाप्रमाणे विविध प्रकारच्या डाळींचे उत्पादनही सुरू केल्या गेले आहे. त्यामुळे महिलांना बाराही महिने कांही ना कांहीतरी रोजगार उपलब्ध होतो ,आणि वर्षभरात सरासरी घर काम करत या महिला सहा प्रतीमहिना सहा ते सात हजार रुपये कमवतात.

**संदर्भ:**

1. विजय मुंडे, लोकमत, 25 जुलै 2023
2. सुभाष बिडे, दैनिक सकाळ, 20 मार्च 2022
3. नारायण काळे, न्यूज 18 लोकमत, 17 जुलै 2024
4. दिलीप पोहनेरकर, ED Tv, 23 ऑक्टोबर 2023
5. www.umedmart.com